# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

## नोटीस

नागपूर महानगरपालिकेची विशेष सभा सोमवार दिनांक २७/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर
दिनांक :- २३/०१/२०२०

आदेशान्वये,

हस्ता/-
(राजेश म मोहिते)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

मागील विचाराधिन विषय
(दि. २० /०९/२०१९)

वि.क्र. ३७५:— {अग्निशमन विभाग} अग्निशमन सेवा शुल्क व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क वाढ करणे बाबत.

मंजूर महासभा ठराव क्र. 355 दि. 10.02.2009, महासभा ठराव क्रमांक 247 दि. 25.08. 2011, स्थायी समिती ठराव क्र. 182 दि. 24.10.2008 स्थायी समिती ठराव क्रमांक 136 दि. 05.10. 2012 व ठराव क्रमांक 364 दि. 09.12.2014 प्रमाणे अग्निशमन सेवा शुल्क व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

सन 2018—19 या आर्थिक वर्षात विभागाचे एकुण उत्पन्न रू. 2,69,96,382 याप्रमाणे झालेले असून फार कमी आहे. अग्निशमनाचे कार्य पार पाडण्यास संबंधित गरजा पुर्ण करण्यास विभागाचे बळकटीकरण होणे गरजेचे आहे. याकरीता विभागाचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 386 (2) प्रमाणे *Except as may otherwise be provided by or under this Act, for every such license, or written permission a fee may be charged at such rate as shall from time to time be fixed by the Commissioner, with the sanction of the Corporation.* उपरोक्त अधिनियमाचे तरतुदीनुसार अग्निशमन शुल्क आकारणी व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे वाढीव शुल्काचा खालीलप्रमाणे तक्ता सादर करण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | सेवा | सेवेचा तपशील | प्रचलित दर (आकडे रूपयात) | सुधारीत दर (आकडे रूपयात) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाहरकत दाखला | 1) इमारत अग्निशमन सेवा शुल्क (प्रथम नाहरकत प्रमाणपत्र घेतेवेळेस) | तक्ता ''अ'' प्रमाणे | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, 2006 मधील अनुसुची 1 दराप्रमाणे |
| | | 2) इमारत नकाशा छाननी फी (स्क्रुटनी फी) (प्रथम नाहरकत प्रमाणपत्र घेतेवेळेस) | अग्निशमन सेवा शुल्क तक्ता ''अ''च्या दरावर 2% | वरिल अग्निशमन सेवा शुल्काचे 2% दरा प्रमाणे |
| | | 3) इमारत सुचनापत्रांचे नुतनीकरण प्रमाणपत्र शुल्क | रू. 2000 | रू. 3000 |
| | | 4) इमारत सुचनापत्रांचे परीपुर्णता प्रमाणपत्र शुल्क | रू. 2,000 | रू. 10,000 (150 चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या व्यावसायिक इमारती) रू. 5,000(150 चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या निवासी इमारती) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 5) इमारतीचे वार्षिक अग्निशमन सेवा शुल्क | अग्निशमन शुल्काच्या 1% | अग्निशमन शुल्काच्या 1% |
| | | 6) व्यापार/व्यवसायासाठी फायर फिटनेस प्रमाणपत्र शुल्क | रू. 2500 | रू. 3,000 |
| | | 7) तात्पुरते बांधकाम/समारंभ/ मंडप/प्रदर्शनी/सर्कस/ मेळावा | रू. 2500 | रू. 3,000 |
| 2 | पाणी उपसा | अ) विहीर उपसा (खाजगी पाणी उपसा) 6 तासांकरीता<br>ब) त्यानंतर प्रती तास | रू. 500<br>रू. 100 | रू. 500 प्रथम 3 तासांकरीता व<br>त्यानंतर रू. 200 प्रती तास |
| | | अ) म.न.पा.च्या मलवाहिनी, लिकेज नाले व इतर बाबींनी खाजगी विहिरींचे पाणी दुषित झाल्यास, तसेच सार्वजनिक विहिरी | निःशुल्क | निःशुल्क<br>(आरोग्य विभागातील सक्षम अधिकाऱ्याचे स्पष्ट शेऱ्यासह विभागाकडे येणारे अर्ज) |
| 3 | अग्निसुरक्षा बंदोबस्त | स्टॅण्डबाय डयुटी<br>अ) अग्निशमन वाहन व कर्मचारी यांचेसह प्रथम 8 तासांकरीता<br>ब) त्यानंतर प्रतीतास | रू. 4000<br>रू. 500 | 8 तासांप्रमाणे रू. 6000 |
| 4 | रुग्ण/ मृतदेह वाहिनी | अ) रुग्णवाहिका | अ) शहराकरीता मोफत<br>ब) म.न.पा. हद्दीबाहेर रू. 10 प्रती कि.मी. प्रमाणे<br>क) हाल्टिंग चार्जेस रू. 50 प्रती तास | सेवाबंद<br>विभागाचे अस्थापनेवर रूग्णवाहिका वाहनचालक व स्ट्रेचर बॉय पद नाही. |
| | | ब) शववाहिका | अ) शहराकरीता मोफत<br>ब) म.न.पा. हद्दीबाहेर रू. 10 प्रती कि.मी. प्रमाणे<br>क) हाल्टिंग चार्जेस रू. 50 प्रतीतास | सेवाबंद<br>विभागाचे अस्थापनेवर शववाहक वाहन चालक व शववाहक कुली पद नाही. |
| 5 | पाणी पुरवठा | (आकस्मिक प्रसंगी)<br>अ) 4500 ते 5000 लिटर क्षमतेचे प्रती फायर टेन्डर | रू 500 | रू. 1000 |
| | | ब) 10,000 लिटर क्षमतेचे प्रती फायर टेन्डर | रू. 1200 | रू. 2000 |
| | | क) 10,000 लिटर क्षमतेचे प्रती वाटर टॅकंर बिना पंप | रू. 800 | रू. 1500 |
| | | ड) 10,000 क्षमतेचे वेगळे पंम्प लावून प्रती टॅकर पाणीपुरवठा | रू. 1200 | रू. 2000 |
| 6 | अग्निशमन व बचाव कार्य | म.न.पा. हद्दीबाहेर अग्निशमन सेवा (Fire Fighting Charges)<br>अ) वाटर टेन्डर/ फायर टेन्डर ट्रिपलमायलेज प्रति किमी. | रू. 30 | रू. 40 प्रती किमी. प्रमाणे |
| | | ब) फायर टेंडर/इमर्जन्सी टेंडर पाठविण्याचे शुल्क | रू. 2000<br>8 तासांकरीता | |
| | | क) वाहनावरील पंम्पाचे पंम्पीग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| | | ड) 20% तुटफुट चार्जेस | 20% | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | इ) हाल्टींग चार्जेस प्रती तास | रू. 300 | |
| | | फ) स्टॅण्डबाय डयुटी प्रती दिवस | रू. 2500 | |
| | | हॅड्रोलीक प्लॉटफार्म /टर्न टेबल लॅडर<br>अ) स्टॅण्डबाय डयुटी | रू. 3000 प्रती 8 तासांकरीता | रू. 4000 प्रती तास |
| | | ब) शिडीचा वापर केल्यास | रू. 1000 अतिरीक्त प्रती तास | |
| | | क) म.न.पा. हद्दीबाहेर | रू. 30 प्रती कि.मी. | |
| | | ड) हाल्टींग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| | | फोम टेंडर चार्जेस<br>अ)म.न.पा. हद्दीबाहेर | रू. 30 प्रती किमी. | रू. 40 प्रती किमी. प्रमाणे<br>फोम लिक्विड खरेदी दराप्रमाणे |
| | | ब) वाहनावर माउंटेड पंम्पींग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| | | क) फोम लिक्विड | खरेदी किमतीच्या दुप्पट | |
| | | ड) हाल्टींग चार्जेस | रू. 500 प्रती तास | |
| 7 | पांणी पंपिंग | पोर्टेबल पंप चार्जेस<br>अ) खाजगी कामासाठी | रू. 500 प्रती तास | अनु क्र. 2 मध्ये नमुद असल्याने रद्द |
| | | ब) बाहेरगावी फायर टेंडर सोबत नेल्यास | रू. 500 प्रती तास | रू. 500 प्रती तास (कार्य करतेवेळेस) |
| | | क) सबमर्सीबल पंप डिझलवर चालणाऱ्या जनरेटर सहित | रू. 500 प्रती तास | अनु क्र. 2 मध्ये नमुद असल्याने रद्द |
| 8 | वॉटर रेस्क्यु | फायबर/रबर बोट कर्मचाऱ्यांसह | रू. 500 प्रती तास | रू. 1000 प्रती तास |
| 9 | तात्पुरता नाहरकत दाखला | अ) तात्पुरते फटाका/मुर्ती दुकानास / इतर व्यवसायास नाहरकत दाखला शुल्क | रू. 1,000 | रू. 2,000<br>(150 चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेले )<br>रू. 1000<br>(150 चौ.मी. पेक्षा कमी क्षेत्रफाळ असलेल्या व्यावसायिक धारकांनी मागणी केल्यास) |
| 10 | फायर ऑडिट | अग्निसुरक्षा संबंधातील तपासणी अर्जदारांचे विनंती अर्जानुसार | –– | रू. 3,000 |
| 11 | प्रशिक्षण | अ) अग्निशमन प्रशिक्षण महाविद्यालय / शासकीय/ खाजगी संस्था यांच्यातर्फे आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण शुल्क | –– | रू. 1,000 व्यक्ती, प्रती महिना (भोजनखर्च सोडून) |
| | | ब) प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण (व्यावसायिक/खाजगी संस्था यांचे कडून विभागाला अर्ज प्राप्त झाल्यास शुल्क आकारणी ) | –– | 1 दिवस फी रू. 100<br>2 दिवस फी रू. 200<br>7 दिवस फी रू. 300<br>30 दिवस फी रू. 1000<br>(प्रशिक्षणार्थी भोजनखर्च परस्पर नेमणूक केलेल्या मेस कंत्राटदार यांना भुगतान करतील) |
| | | अग्निशमन व बचाव कार्याचे जनजागृती प्रशिक्षण राबवितेवेळेस निःशुल्क | –– | निःशुल्क |

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 386 (2) चे तरतुदीनुसार सुधारित अग्निशमन शुल्क आकारणी व्यतिरिक्त इतर कार्यासाठी आकारण्यात येणारे वाढीव शुल्काचे विषयास महासभेने विचारात घेवून मंजुर करून घेणे.

टीप :– सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध

| | |
|---|---|
| वि.क्र. ३७६:— {अग्निशमन विभाग} | अधिकारी/कर्मचारी यांचे वेगवेगळे पाठयक्रमा दरम्यान होणारा खर्च अनुज्ञेय करण्याबाबत. |

अग्निशमन विभागातील अधिकारी तथा कर्मचारी त्यांच्या कर्तव्यकाळात कामाची गुणवत्ता वाढविण्याकरीता नियमित प्रशिक्षण घेणे आवश्यक असते. याकरीता नागपूर महानगरपालिकेद्वारे त्यांना राज्य शासनाचे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथील सब ऑफिसर्स कोर्स, स्टेशन ऑफिसर्स कोर्स, डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स आणि राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय (एनसीडीसी) येथील वेगवेगळया पाठयक्रमाकरीता पाठविले जातात.

या पाठयक्रमा दरम्यान अधिकारी /कर्मचारी यांना येणारा खर्च म.न.पा.तर्फे वहन केला जातो. याबाबत तात्कालीन प्रशासक श्री. बी.एन. माखीजा, यांचे दि. 21.08.1985 चे मंजुरीचे धोरण आहे. त्याप्रमाणे विभागातील एकुण 139 अधिकारी/कर्मचारी यांनी पाठयक्रम पुर्ण केलेले आहे. सेवाप्रवेश व पदोन्नती नियमावलीतील शैक्षणिक पात्रतेत अशा प्रकारचे पाठयक्रम उत्तीर्ण करणे बंधनकारक आहे. सदर धोरण प्रशासक स्तराचे असून फार पूर्वीचे आहे. त्यामुळे या विषयाचे महासभा मान्यता धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय नामपा—2015/1652/प्र.क्र.1662नवि—26 दि. 12 मे, 2017 प्रमाणे अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे सेवाप्रवेश नियम मंजुर आहेत. ज्यामध्ये सरळसेवा भरतीचे अग्निशामक विमोचक यांना महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा अकादमी येथील 6 महिने कालावधीचे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. त्याकरीता 12 मे, 2017 नंतर रूजू होणाऱ्या अग्निशामक विमोचक यांना प्राथमिक अग्निशमन पाठयक्रम तथा त्या पदाकरीता लागणारे इतर कोणत्याही पाठयक्रमाचा खर्च स्वतः वहन करावा लागेल. तथापी, सेवाप्रवेश नियम मंजुर होण्याआधी सरळसेवा भरतीने नियुक्त झालेले अग्निशामक विमोचक यांना पाठयक्रमादरम्यान झालेला खर्च अनुज्ञेय राहील.

तसेच अग्निशमन विभागाचे अधिकारी तथा कर्मचारी यांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय येथील सब ऑफिसर्स कोर्स, स्टेशन ऑफिसर्स कोर्स, डिव्हिजनल ऑफिसर्स कोर्स आणि राष्ट्रीय नागरीक सुरक्षा महाविद्यालय (एनसीडीसी) येथील वेगवेगळया पाठयक्रमाकरीता पाठविल्यानंतर उत्तीर्ण झाल्यास पाठयक्रमा दरम्यान नियमानुसार येणारा संपुर्ण खर्च म.न.पा. वहन करेल, या धोरण निश्चितीच्या विषयास विचारात घेणे.

टिप :— सविस्तर माहिती नस्तीत संलग्न

## नवीन विषय

| | |
|---|---|
| वि.क्र. ५६:— {नगर रचना विभाग} | नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांच्यातील हस्तांतराच्या प्रक्रियेवर विशेष चर्चा करण्याकरिता. |

———————————————